दि. ११/०३/२०२४

# जाहिरात नमुना

## आरोग्य विभाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान
## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, पुणे
## विविध पद भरती

हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत कंत्राटी तत्वावर रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | वयोमर्यादा | संवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | MBBS )MCI / MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य ( नोंदणी धारकास प्राधान्य,जर MBBS अर्हता धारक उमेदवार उपलब्ध झाले नाही तर BAMS अर्हता धारक उमेदवार घेण्यात येतील. BAMS अर्हता धारकांकरीता दवी MCIM, नोंदणीधारक असावे. | 1)MBBS अर्हता धारक प्रती महा र.रु.६०,०००-/ 2) BAMS अर्हता धारक उमेदवारांकरीता प्रती महा र.रु २५,०००/- मानधन व र.रु १५,०००/- कामाधारित मोबदला | 1)MBBS अर्हता धारकांकरीता कमाल वयोमर्यादा ७० वर्षा पर्यंत )वय वर्ष ६० नंतरच्या उमेदवारांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत( 2) BAMS अर्हता धारक उमेदवारांकरीता खुला प्रवर्गाकरीता ३८ वर्षे पर्यंत व मागासप्रवर्गाकरीता ४३ वर्षे पर्यंत | अनु.जाती (१२), अनु.जमाती (०७), विजाअ (०४), भजब (०२) भजक (०१), भजड (०१), विमाप्र (०१), इमाव (१९), ई.डब्ल्यू.एस (१०),. एस.ई.बी.सी (१०),. खुला (२७), एकूण पदे-९४ |
| २. | स्टाफ नर्स | GNM / BSc Nursing )MNC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य ( | रु.२००००-/ प्रति महा | खुला प्रवर्गाकरीता ३८ वर्षे पर्यंत व मागासप्रवर्गाकरीता ४३ वर्षे पर्यंत | अनु.जाती (०८), अनु.जमाती (०५), विजाअ (०३), भजक (०२), भजड (०२), विमाप्र (०२), इमाव (१५), एस.ई.बी.सी (१०),. ई.डब्ल्यू.एस (०९),. खुला (२२), एकूण पदे-७८ |
| ३. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector CourseFrom Government Institute OR Government Recognized Institute | रु.१८०००-/ प्रति महा | | अनु.जाती (१३), अनु.जमाती (०७), विजाअ (०४), भजब (०१) भजक (०१), भजड (०२), विमाप्र (०२), इमाव (१९), एस.ई.बी.सी (१०),. ई.डब्ल्यू.एस (१०).. खुला (२९), एकूण पदे-९७ |

अटी व शर्ती :-

१) वरील पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दिनांक २९.०६.२०२४ पर्यंतचा राहिल.

२) राज्यशासनाच्या हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानासाठी वैद्यकिय अधिकारी यांची नेमणुक करताना शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना दि.०७/१२/२०२३ रोजीच्या पत्राप्रमाणे खाली दिलेल्या अटी शर्तीना अधिन राहून

- १५ वा वित्त आयोगा अंतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी म्हणून एम.बी.बी.एस पदवीधारकांच्या नियुक्तीला प्राधान्य देण्यासाठी केंद्र शासनाने सूचविले आहे. त्यानुसार नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी पदांकरीता एम.बी.बी.एस पदवीधरकांची नियुक्ती करणेकरीता प्राधान्य देण्यात यावेत.
- परंतू अनेक प्रयत्न करुनही एम.बी.बी.एस पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास,१५ वा वित आयोग अंतर्गत नागरीआरोग्य वर्धीनी केंद्राकरीता वैद्यकिय अधिकारी म्हणून एम.बी.बी.एस पदवीधारक उमेदवार उपलब्ध होई पर्यंत अथवा ६ ते ११ महिन्यांकरीत बी.ए.एम.एस. पदवीधारक उमेदवारांना वैद्यकिय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात यावी.
- सदर बी.ए.एम.एस पदवीधारक वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मनुष्यबळ विभागाचे दि.०९/०६/२०२३ रोजीचे पत्र जा.क्र.राआसोमु/ मुनष्यबळ कक्ष/पदभरती/३४३५४-७०१/२०२३ नुसारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावी.
- सदर बी.ए.एम.एस पदवीधारक वैद्यकिय अधिकारी पदांकरीता केंद्रशासनाच्या सीपीएचसी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार रु.२५,०००/- अधिक रु.१५,०००/-(पीबीआय) कामावर आधारित मोबदला याप्रमाणे प्रती महिना रु.४०,०००/- मानधन मार्गदर्शक सूचनांनुसार अदा करण्यात यावे.

३) वैद्यकिय अधिकारी एम.बी.बी.एस /बी.ए.एम.एस या पदांकरीता अर्ज मागवून पात्र उमेदवारांना गुणांकनाप्रमाणे उमेदवारांना मुलाखतीसाठी खालीलप्रमाणे येईल.

वैद्यकिय अधिकारी (MBBS) हि पदे मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करणेत येईल.

१) Subject knowledge (१०)

२) "Research academic Knowledge (१०)"

३) Leadership Quality (१०)

४) Administrative Abilities (१०)

५) Experience (१०)

a) For govt.experience-२ marks for one year

b) For private experience-१ marks for one year

(संबंधित उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्रामध्ये नमुद केलेल्या कालावधीसाठी संबंधीत संस्थांनी अदा केलेल्या मानधनाची पावती व बँक स्टेटमेंट जोडणे आवश्यक आहे.)

Total experience -१० marks Maximum

एकुण गुण -५०

४) स्टाफ नर्स व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) या पदांकरीता अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागवून गुणांकन पध्दतीने खालीलप्रमाणे निवडप्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying मधील गुण )अंतिम वर्षाच्या गुणांच्या आधारे( | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे) .उदा ६० %गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० %प्रमाणे Proportion =६० x २०/१००=१२( | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास )संबंधीत विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी (. | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे) .उदा १ स्टाफ नर्स पदाची आवश्यकता शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त बी.एस.सी .नर्सिंग हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास बी.एस.सी .नर्सिंगच्या अंतिम वर्षात ६० %प्राप्त असल्यास त्याचे २० %प्रमाणे Proportion = ६० x २०/१००=१२( | २० गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत )१ वर्षाकरिता ६ गुण ,जास्तीत जास्त ३० गुण ( | ३० गुण |
| | | एकूण १०० गुण |

५) सदरची पदे राज्यशासनाची नियमित पदे नसून पुर्णतः कंत्राटी तत्वावर आहे.

६) इच्छुक उमेदवारांनी दि.११ /०३/२०२४ ते दि. २६/०३/२०२४ रोजी सायं.०६ वाजे पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.अर्जा सोवत जन्म तारखेकरीता (वयाचा दाखला/दहावीची टीसी/सनद/जन्म प्रमाणपत्र) फोटो आयडी/रहिवाशी दाखला, लाहान कुटुंब असल्याचे प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हताा प्रमाणपत्र(शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका/रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र/अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेची एमएमसी नोंदणी/नोंदणी नूतनीकरण/अनुभव प्रमाणपत्र)जातीचे प्रमाणपत्र/उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव,सामाजिक प्रवर्ग,कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग,जन्म दिनांक भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी इ.माहिती काळजीपूर्वक भरावी.शासकिय,निमशासकिय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केलेल्या उमेदवरांना प्राधान्य देण्यात येईल. सद्याचा पासपोर्ट साईज फोटोसह सोवत जोडलेल्या लिंक https://cha.maha-arogya.com वर जाऊन अर्ज सादर करावा.

७) अर्जा सोवत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी र.रु.३००/- आणि मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी र.रु. २००/- राहिल. सरदरचे शुल्क दिलेल्या सॉप्टवेअर प्रणाली मधून गेटवे पेमेंट सिस्टीम (Googal Pay, Paytm, Phone Pay Etc ) व्दारे करण्यात यावे. शुल्क भरणेकरिता डी डी अथवा रोख रक्कमेची गरज नाही.

८) उमेदवारांकडून सदर ऑनलाईन अर्ज अर्धवट,अपूर्ण वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास संवंधित उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्यावावतची सर्वस्वी जवावदारी संवंधित उमेदवराची राहील. यावावत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्वीकारली जाणार नाही.

९) पदभरतीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी

१०) उमेदवरास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यस अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र शुल्क भरणे वंधनकारक राहील.

११) महिला उमेदवरांनी त्यांच्या नावात काही वदल असल्यास(लग्नापूर्वीचे नाव,लग्नानंतरचे नाव) त्या संदर्भात आवश्यक कागदपत्रे,विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.

१२) तद्नंतर अर्जाची छाननी करुन उमेदवारांची पात्र/अपात्र यादी इ. वावत सविस्तर माहिती जिल्हा परिपदचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१३) निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर,कोणतेही कारण न देता वदल अथवा रद्द करण्याचे व जाहिरात दिलेली पद संख्या किंवा ठिकाण वावत अधिकार मा.मुख्य कार्यकारी,जिल्हा परिषद पुणे यांनी राखून ठेवले आहे.

१४) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल.यावावत उमेदवाराने कोणत्याही दवावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१५) सॉफटवेअर प्रणाली मध्ये अर्ज भरताना सुरुवातीला सादर केलेली सर्व प्रमाणपत्रे हीच गाहय व अंतिम धरण्यात येतील.

xxx

मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
तथा अध्यक्ष,<br>
राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि. पुणे